# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १८० /२०२५ दि. १४ /०८/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीतील मोठागाव–मानकोली असा उड्डाणपुल वाहतुकीसाठी सुरू झालेला असुन मोठागाव ते कोपर गाव असा रस्ता एमएमआरडीए मार्फत नव्याने बनविण्यात आलेला आहे. डोंबिवली शहरात येणारी वाहने ही रेल्वे क्रासिंग दरम्यानचे फाटक टाळण्यासाठी सदर रस्त्याचा मोठया प्रमाणात वापर करीत आहेत. त्यामुळे कोपर रोड वरून मोठया प्रमाणावर वाहतुक वाढलेली आहे. त्याचप्रमाणे कोपर रोडवर असणारे शास्त्रीनगर हॉस्पीटल, नवी मुंबई म.न.पा. सार्वजनिक बसचा स्टॉप असल्याने सदर रस्त्यावर वाहतुक सुरळित राहणे अत्यावश्यक आहे. कोपर रोडवर अनावश्यकरित्या व बेशिस्तिने उभ्या राहणा–या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी दीर्घकाळ होत आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | कोपर ब्रिज, डोंबिवली पश्चिम ते शास्त्रीनगर हॉस्पीटल, कोपर क्रास रोड दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजुस | नो पार्किंग | ८० मीटर | २४ तास |
| २ | शास्त्रीनगर हॉस्पीटल समोर, कोपर रोड | नो पार्किंग | १५० मीटर | २४ तास |
| ३ | शास्त्रीनगर हॉस्पीटल विरूद्ध बाजुस, कोपर रोड पार्किंग | पार्किंग | १५० मीटर | २४ तास |
| ४ | मिनाताई ठाकरे उदयान ते जुनी डोंबिवली क्रास रोड (प्रेरणा स्नॅक्स कॉर्नर) पर्यंत १० मीटर कॉर्नर सोडुन | पी १ व पी २ | ६०० मीटर | २४ तास |
| ५ | जुनी डोंबिवली क्रॉस रोड (प्रेरणा स्नॅक्स कॉर्नर) ते नवीन कोपर गाव रिंग रोड पर्यंत | नो पार्किंग | २०० मीटर | २४ तास |

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे / कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे / कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.